BHAASHAA

The centre for preservation and enhancement of regional languages

# ''मराठी 'भाषा' ऑलिंपियाड''ची तपपूर्ती...

प्रादेशिक भाषांच्या जतन संवर्धनासाठी गेली एकोणीस वर्षे 'भाषा' ही स्वयंसेवी संस्था कार्यरत आहे. मराठी भाषेत दर्जेदार लिहिती व वाचती पिढी घडावी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून 'भाषा' संस्थेतर्फे एक महत्त्वाकांक्षी वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प २०१५ पासून राबवला जात आहे.

**मराठी 'भाषा' ऑलिंपियाड :**

इयत्ता दुसरी ते नववी साठीच्या या परीक्षेत एसएससी, सीबीएसई व आयसीएसई बोर्डांच्या शाळांतील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

महाराष्ट्र व गोवा येथील शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांत ही परीक्षा अधिकाधिक लोकप्रिय ठरत असून २०२५-२६ या वर्षी या परीक्षेत सुमारे दहा हजार विद्यार्थी विक्रमी संख्येने सहभागी झाले.

**परीक्षेविषयी माहिती :**

- ज्ञान-आकलन-उपयोजन-कौशल्य या नवरचनावादाच्या घटकांचा विचार करून या रंजक परीक्षेची बांधणी करण्यात येते. वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ या दोन्ही पद्धतींनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले जातात.
- परीक्षा ऑक्टोबर महिन्यात सहभागी शाळांच्या प्रांगणात आयोजित करण्यात येणार आहे.
- परीक्षेचे शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यास रु. ३००/- फक्त असून शालेय अभ्यासक्रमाला उपयुक्त अशी अभ्यास सराव पुस्तिका विद्यार्थ्यांना दिली जाते.
- प्रत्येक विद्यार्थ्याला पुरवणी वाचनाचे खास पुस्तक 'भाषा' तर्फे भेट म्हणून दिले जाते. प्रत्येक विद्यार्थ्याला निकालानंतर प्रमाणपत्र देण्यात येते.
- इयत्ता दुसरी, तिसरी व चौथीतील गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या प्रत्येक इयत्तेतील पहिल्या पंचवीस विद्यार्थ्यांना विशेष प्रावीण्य पदक दिले जाते.

**'भाषा' व 'एम के सी एल' चा खास संयुक्त उपक्रम :**

भाषा व तंत्रज्ञान यांची सांगड घालून विद्यार्थ्यांच्या भाषिक गुणवत्तेचा विकास साधण्यासाठी 'भाषा' संस्था व 'महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड' (MKCL) यांच्यातर्फे संयुक्तरीत्या द्वितीय पातळीवरील परीक्षा Online पद्धतीने घेण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| दुसऱ्या पातळीवरील परीक्षेची तारीख : | जानेवारी अखेर (फक्त इ. ५ वी ते ९ वी तील विद्यार्थ्यांसाठी) (पहिल्या पातळीतून प्रावीण्य व विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांसाठी) |
| परीक्षेचे स्वरूप : | Online, वस्तुनिष्ठ, सोयीच्या MS-CIT केंद्रावर |
| बक्षीस समारंभ : | फेब्रुवारी २०२७ |

यातून पदकप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांची यादी (मेरिट लिस्ट) जाहीर केली जाईल आणि त्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी 'खास मार्गदर्शन उपक्रम' (मेंटॉरशिप प्रोग्रॅम) राबवला जाईल.

विशेष सूचना : 'भाषा प्रज्ञा पदक' मिळवण्यासाठी Online परीक्षा देणे विद्यार्थ्यांना अनिवार्य राहील. या प्रकल्पाची उपयुक्तता लक्षात घेऊन दरवर्षीप्रमाणे या उपक्रमास सहकार्य कराल, असा विश्वास आहे.

जाणता वाचक, जिज्ञासू संशोधक आणि सकस लेखक घडविण्याच्या दृष्टीने 'भाषा'ने आखलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांच्या वृद्धीसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असलेल्या या उपक्रमात सहभागी व्हावे.


## संपर्क : 'भाषा फाउंडेशन', पुणे

C-9 रेणुका कॉम्प्लेक्स, जंगली महाराज रोड, मॅकडॉनल्ड समोर, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४

भ्रमणध्वनी : ९१३००९६०३८

bhaashaa.org@gmail.com / admin@bhaashaa.org

www.bhaashaa.org